CMYK

सन २०२४ - २५ खरीप हंगामातील १२७ कोटी ५० लाख रुपयांची नुकसान भरपाई शेतकऱ्यांच्या खात्यात होणार जमा >> पान 2

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत यांच्या उपस्थितीत १७ सामंजस्य करार >> पान 3

शैक्षणिक धोरणात योगदान देणाऱ्या आमदाराची विद्यापीठ सिनेटवर निवड >> पान 4

**सुविचार**

नेहमी नवीन शिकण्याची तयारी ठेवा.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 39 ■ शनिवार, दि. 30 ऑगस्ट 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




४८ वर्षीय तमिळ अभिनेता विशाल अन् अभिनेत्री साई धनशिकाचा साखरपुडा संपन्न आतील पान

# राज्यातलं सरकार इंग्रजांपेक्षा बेकार

## आजही आंदोलन सुरूच राहणार – मनोज जरांगे पाटील

मुंबई/प्रतिनिधी : मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मराठा आंदोलक नेते मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा आंदोलनाचं हत्यार उपसलं आहे. त्यांनी आपल्या हजारो समर्थकांसह बुधवारी (२७ ऑगस्ट) थेट मुंबईच्या दिशेनं कूच केली होती. शुक्रवारी (२९ ऑगस्ट) पहाटे ते आपल्या सहकाऱ्यांसह मुंबईत दाखल झाले. जरांगे पाटलांसोबत मोठ्या संख्येनं मराठा कार्यकर्तेदेखील मुंबईत पोहोचले असून, ते आझाद मैदानात आंदोलन करत आहेत. सुरक्षेच्या दृष्टिकोनातून मोठ्या प्रमाणावर पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.





राज्यातलं सरकार म्हणजे इंग्रजांपेक्षा बेकार आहे असा घणाघात मनोज जरांगे पाटील यांनी केला. मराठ्यांच्या मुलांना वाईट वागणूक मिळत आहे असं ते म्हणाले. मराठ्याची मुलं माज आणि मस्ती घेऊन मुंबईत आली नाहीत तर त्यांच्या मनातील वेदना घेऊन मुंबईत आली आहेत असं जरांगे पाटील यांनी बजावलं. सरकारने मराठा समाजाच्या वेदनांची जाण ठेवावी असं आवाहनही मनोज जरांगे पाटील यांनी केलं.

मराठा आंदोलकांना खायला मिळू नये यासाठी खाऊ गल्ली बंद केल्याचा आरोप मनोंज जरांगे पाटील यांनी केलाय. स्वच्छतागृहेही मिळू नयेत अशी व्यवस्था सरकार आणि प्रशासनानं केली असा आरोपही त्यांनी केला. आझाद मैदानावर पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला पोलिसांनी दिलेली परवानगी फक्त ६ वाजेपर्यंत होती. मात्र त्यांनी पोलिसांना जास्तीची परवानगी मागितली होती. त्यांना पोलिसांनी उद्याही आंदोलनाला परवानगी दिली आहे. >> पान ३

## मराठ्यांच्या प्रश्नावर सरकार सकारात्मक

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली भूमिका स्पष्ट, विरोधकांवर साधला निशाणा

**मुंबई/प्रतिनिधी:** मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील हे मुंबईतील आझाद मैदानात आंदोलनाला बसले आहेत. करोडो मराठा आंदोलक मुंबईत ठाण मांडून आहेत. आरक्षण घेवूनच मुंबई सोडणार असल्याची भूमिका मनोज जरांगे पाटील यांनी मांडली. या सर्व आंदोलनावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली. ''सर्व समाजाला समान वागणूक दिली जात आहे. मराठा आरक्षणाबाबत आम्ही सकारात्मक आहोत,'' असं स्पष्ट करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाविकास आघाडीवर जोरदार टीका केली.

**शांततेत आंदोलन करण्याचं आवाहन**

''लोकशाही पद्धतीनं आंदोलन चालत असेल तर त्याला मनाई नाही. सरकारच्या वतीनं त्यांना सहकार्य केलं जात आहे. आंदोलकही सहकार्य करत आहेत. वाहतूक कोंडी झाली हे मात्र नक्की आहे. काही लोक हे वेगळ्या पद्धतीनं वागतात. अशा लोकांकडं लश्र दिलं पाहिजे. मनोज जरांगे पाटील यांनी देखील सहकार्य करण्याचं आवाहन आंदोलकांना केलं आहे. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार प्रशासन काम करत आहे. त्यामुळं आमच्यावरही काही बंधनं आहेत,'' असं म्हणत शांततेच्या मार्गानं आंदोलन करण्याचं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं.



**मार्ग काढण्यासाठी सरकार प्रयत्नशील**

''मनोज जरांगे पाटील यांनी आंदोलनासाठी पुन्हा परवानगीसाठी अर्ज केला आहे. कायद्याच्या चौकटीत राहून प्रशासन निर्णय घेणार आहे. >> पान ३

# जरांगे पाटील यांची ओबीसीतून आरक्षण मिळण्याची मागणी कायद्याला धरून : घटनातज्ज्ञ उल्हास बापट

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी:** मराठा आंदोलक मनोज जरांगे-पाटील यांनी मराठा आरक्षणासाठी पुन्हा एकदा मुंबईत आंदोलन सुरू केलंय. मराठा समाजाला आरक्षण मिळण्यासाठी मराठा आंदोलक शुक्रवारी मुंबईत मोठ्या संख्येनं दाखल झालेत. मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळावं या मागणीवर मनोज जरांगे-पाटील ठाम आहेत. ''मनोज जरांगे पाटील यांनी केलेली मागणी कायद्याला धरून आहे,'' अशी माहिती घटनातज्ज्ञ उल्हास बापट यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

**मराठा आंदोलनासाठी मराठा आंदोलक मुंबईत**

मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळावं यासाठी मागील अनेक वर्षांपासून आंदोलन सुरू आहे. परंतु अद्याप मराठा समाजाला आरक्षण मिळालेलं नाही. यासाठी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा आंदोलनाचं शस्त्र उगारलं आहे. यावेळी त्यांनी लाखो मराठा समाज बांधवांसह मुंबईतील आझाद मैदानावर आंदोलन केलं आहे. ''मनोज जरांगे पाटील यांची मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्याची मागणी कायद्याला धरून आहे. पण यासाठी सर्वोच्च न्यायालयानं जी ट्रिपल टेस्ट सांगितली आहे, ती करावी लागणार आहे,'' अशी माहिती घटनातज्ज्ञ उल्हास बापट यांनी दिली.

**मनोज जरांगे पाटील यांची मागणी कायद्याला धरून**

''आताचा कायदा बघितला तर कोणत्याही परिस्थिती ५० टक्क्यांच्यावर आरक्षण देता येत नाही. मनोज जरांगे पाटील यांची ओबीसीतून आरक्षण मिळण्याची मागणी कायद्याला धरून आहे. परंतु यासाठी सर्वोच्च न्यायालयानं एक



ट्रिपल टेस्ट सांगितली आहे. ज्यात मराठा समाज हा मागास आहे, असं आयोगानं ठरवलं पाहिजे. तसंच इम्पिरिकल डेटा उपलब्ध पाहिजे तोही सध्याचा. महत्त्वाची बाब म्हणजे ५० टक्क्यांच्यावर आरक्षण देता येणार नाही. या तीन महत्वाच्या गोष्टी आहेत. या तीन गोष्टीत जर सगळं बसलं तर मराठा समाजाला ओबीसीत घेता येईल. तसंच यासाठी राजकीय मंडळींनी पुढाकार घेतला पाहिजे,'' असं घटनातज्ज्ञ उल्हास बापट म्हणाले.

**अंतिम निर्णय सर्वोच्च न्यायालयाचा**

''सगळ्यात महत्त्वाचं मुद्दा म्हणजे मराठा समाज हा मागास आहे असं मागासवर्गीय आयोगानं ठरवावं. तसंच ज्यांना गरज आहे त्यांना आरक्षण मिळालं पाहिजे. यासाठी राजकीय नेत्यांनी जे करायला पाहिजे ते होत नाहीये. या सगळ्या गोष्टीत सर्वोच्च न्यायालयच अंतिम निर्णय देणार आहे. त्यामुळं सर्वोच्च न्यायालय जे ठरवणार तेच होणार आहे. आताची लढाई ही जरी राजकीय वाटत असली तरी याचा अंतिम निर्णय हा सर्वोच्च न्यायालय घेणार आहे. आता आयोग स्थापन करून आयोगानं मराठा समाज मागास आहे ठरवलं पाहिजे. यानंतर कायदा केला. तसंच न्यायालयानं ते मान्य केलं पाहिजे'' अशी माहिती घटनातज्ज्ञ उल्हासब बापट यांनी दिली.

## भाजप आमदाराचे विधानसभा अध्यक्षांना पत्र; मराठा आरक्षणासाठी विशेष अधिवेशन बोलवा


**मुंबई/प्रतिनिधी:** राज्यातील सर्वात लक्षवेधी मराठा आरक्षण आंदोलनास आजपासून सुरुवात झाली असून मनोज जरांगे पाटील यांनी आझाद मैदानात आमरण उपोषण सुरू केलं आहे. त्यांच्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी अनेक नेते मंडळी पुढे येत असून आमदार-खासदारही सहभागी होऊन भूमिका मांडत आहेत. त्यातच, सोलापूर जिल्ह्याच्या पंढरपूर-मंगळवेढ्याचे आमदार समाधान आवताडे यांनी विधानसभा अध्यक्षांना पत्र लिहिलं आहे. सकल मराठा समाजास आरक्षण मिळणेकरीता महाराष्ट्र राज्य विधीमंडळाचे एक दिवसीय विशेष अधिवेशन बोलविण्याची मागणी आमदार आवताडे यांनी केलीय. राज्याचे विधानसभा सभापती राहुल नार्वेकर यांना पत्र लिहून आरक्षणाच्या प्रश्नावर थेट भूमिका त्यांनी घेतली. राज्यात महायुतीचे सरकार असून आवताडे हेही महायुतीमधील प्रमुख पक्ष असलेल्या भाजपचे आणि देवेंद्र फडणवीसांच्या पक्षाचे ते आमदार आहेत. समाधान आवताडे यांनी दिलेल्या पत्रानुसार, उपरोक्त विषयान्वये आपणास विनंती करतो की, महाराष्ट्र राज्यातील मराठा समाजास आरक्षण मिळाले पाहिजे यासाठी मनोज दादा जरांगे-पाटील यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र राज्यातील सकल मराठा समाज मुंबई येथील आझाद मैदानासह मुंबई शहरामध्ये आंदोलनासाठी पुन्हा एकदा एकवटला आहे. मनोज दादा जरांगे-पाटील यांच्या मागणीप्रमाणे गरजवंत सकल मराठा समाजास आरक्षण मिळाले पाहिजे, अशी सकल मराठा समाजाची तीव्र मागणी आहे. तरी मराठा समाजास आरक्षण मिळणेकरीता महाराष्ट्र राज्य विधीमंडळाचे एक दिवशीय विशेष अधिवेशन बोलविण्यात यावे ही नम्र विनंती, असे आमदार समाधान महादेव आवताडे यांनी म्हटले आहे.

# मराठवाड्यात ढगफुटी सृदृश्य पाऊस, अनेक गावांचा संपर्क तुटला

## सरकार सर्वोतपरी मदत करणार, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आश्वासन

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी:** राज्याच्या विविध भागात जोरदार पाऊस कोसळत आहे. विशेषत: मराठवाड्यात पावसानं धुमाकूळ घातला आहे. नांदेड आणि बीड जिल्ह्यात मोठा पाऊस झाला आहे. नांदेड तालुक्यातील सोमेश्र्वर रहाटी जैतापूर परिसरात दोन दिवसापासून मुसळधार पाऊस सुरु आहे. आज पहाटे ढगफुटी झाल्यानं नांदेडकडे जाणारा राहाटी पुलावरुन पाणी वाहत होते. त्यामुळं नांदेड ते सोमेश्र्वर जैतापूर रहाटी या गावाचा संपर्क तुटला आहे. यावर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. प्रशासन योग्य रितीने सर्व परिस्थिती हाताळत आहे. सर्व काही नांदेडमध्ये केलं जात आहे. राज्य सरकार सर्वोतपरी मदत करेल असे आश्र्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले आहे.



नांदेडमध्ये मोठा पाऊस झाला आहे. मी तेथील प्रशासनाच्या संपर्कात असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. वरील धरणातून पाणी मोठ्या प्रमाणात सुटल्याने पाणी आलं आहे. बाजूच्या राज्यांसोबत चर्चा सुरु केली आहे. लष्कराला देखील पाचारण केलं आहे. प्रशासन योग्य रितीने सर्व हाताळत आहे. सर्व काही नांदेडमध्ये केलं जात आहे. राज्य सरकार जी मदत असेल ती करेल असे मुख्यमंत्री म्हणाले.

बीडच्या धनेगाव येथील मांजरा प्रकल्पातून दुपारपासून पाण्याचा विसर्ग वाढवण्यात आला आहे. मांजरा धरण पाणलोट क्षेत्रात पडत असलेल्या पावसामुळं धरणाचे एकूण सहा वक्री दरवाजे उघडण्यात आले आहेत. मांजरा नदीपात्रात १९२१८.५४ क्यूसेक्स इतका पाण्याचा विसर्ग केला जात आहे. कालपासूनच या धरणाचे सहा दरवाजे उघडण्यात आले होते. आज गेट क्रं १,३,४,६ हे १ मीटरने तर गेट २,५ हे ०.७५ मिटरने वर उघडत नदीपात्रात पाण्याचा विसर्ग केला असल्याने.मांजरा नदी काठावरील नागरिकांना खबरदारीचे आव्हान प्रशासनामार्फत करण्यात आले आहे.

मुंबईच्या पश्र्चिम उपनगरात मुसळधार पाऊस सुरू आहे. पश्र्चिम उपनगरात जोरदार पाऊस सुरू असल्यामुळे अंधेरी सबवे पाण्याखाली गेला आहे. अंधेरी सबवे मध्ये तीन ते चार फूट पाणी भरल्यामुळे अंधेरी सबवे वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे. सबवे च्या बाहेर पोलिसांनी रस्सी बांधून बंद केली आहे. अंधेरी पूर्व ते पश्र्चिम ला जाण्यासाठी सध्या पोलिसांकडून गोखले पुलाचा वापर करा असा सूचना केली जात आहे. मात्र पश्र्चिम उपनगरात जोरदार पाऊस सुरू असल्यामुळे अंधेरी जोगेश्र्वरी गोरेगाव मालाड विलेपार्ला कांदिवली दहिसर या सर्व भागांमध्ये असलेल्या सखल भागात पाणी भरायला सुरुवात झाला आहे.



CMYK

## साथीचे आजार टाळण्यासाठी योग्य ती खबरदारी गरजेची

राज्याला पावसाने चांगलेच झोडपल्याने राज्यात सध्या साथीच्या आजाराने डोके वर काढले आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या आकडेवारीनुसार जानेवारी ते १४ ऑगस्ट २०२५ या कालावधीत राज्यभरात एन्फ्लुएंजा आजाराचे ( फ्लयू ) ६६३ रुग्ण आढळले आहेत यापैकी १४ रुग्ण मागील दीड महिन्यात आढळले असून तीन रुग्णांचा मृत्यू झाला आहे. अर्थात ही सरकारी आकडेवारी आहे. रुग्णांची संख्या यापेक्षा कितीतरी अधिक असण्याची शक्यता आहे केवळ फ्लयू आजारानेच नव्हे तर डेंग्यू, मलेरिया, चिकणगुणिया यासारख्या साथीच्या आजाराने राज्यातील नागरिक हैराण झाले आहेत. साथीच्या आजाराने रुग्णांची संख्या वाढत चालल्याने आरोग्य विभागाची डोकेदुखी वाढली आहे. राज्यात डेंग्यू, मलेरिया आणि चिकणगुणियाचे रुग्ण मोठ्या प्रमाणात आढळत आहे विशेषतः राज्यातील महापालिका क्षेत्रात डेंग्यू आणि मलेरियाचे रुग्ण आढळत आहे नागपूरसह संपूर्ण विदर्भात देखील डेंग्यूचे रुग्ण आढळत आहे. पुण्यातही जवळपास तीच परिस्थिती आहे त्यामुळे आरोग्य खाते अलर्ट मोडवर आले आहे. मागील काही दिवसांपासून विशेषतः पावसाला सुरवात झाल्यापासून साथीच्या आजाराने डोके वर काढायला सुरवात झाली आहे. डेंग्यू, मलेरिया, चिकणगुणिया यासोबतच सर्दी, खोकला, डोकेदुखी, ताप, शिंका येणे यानेही नागरिक त्रस्त झाले आहेत. पाच वर्षांपूर्वी राज्यातच नव्हे तर संपूर्ण जगात कोरोनाने हाहाकार उडवला होता. कोरोना देखील संसर्गजन्य रोग होता त्यातून आपण आता कोठे सावरलो आहोत तोच आता या साथीच्या आजाराने डोके वर काढले आहे अर्थात हे साथीचे आजार कोरोना इतके धोकेदायक नसले तरी त्याकडे दुर्लक्ष करणे ही मोठी चूक ठरू शकते म्हणूनच आरोग्य खात्याने ही साथ मोडून काढण्यासाठी कंबर कसली आहे. ही साथ अधिक वाढू नये म्हणून आरोग्य खाते सर्वोतोपरी प्रयत्न करीत आहे. आरोग्यखाते त्यांची जबाबदारी पार पाडतच आहे पण आरोग्य खात्यासोबतच नागरिकांनी आणि प्रशासनाने देखील ही साथ आणखी वाढू नये यासाठी याबाबत काळजी घ्यायला हवी. वास्तविक दरवर्षी पावसाळा सुरू झाला की साथीचे आजार पसरतात पण ते पसरू नये यासाठी पावसाळ्यापूर्वीच खबरदारी घेतली जात नाही. या साथीबाबत नगरपालिका असो की महानगरपालिका उदासीनच दिसून येते. दरवर्षी कचऱ्याचे ढीग, घाणीचे साम्राज्य, सांडपाण्याचे डबके यांचे वेळीच सर्वेक्षण केले जात नाही. त्यामुळे शहरात जागोजागी असलेले कचऱ्याचे ढीग, सांडपाण्याचे डबके, आणि घाणीचे साम्राज्य पसरलेले दिसते. याची वेळीच विल्हेवाट लावली गेली असती तर आज ही वेळ आली नसती. डेंग्यू, मलेरिया, चिकणगुणिया यासारखे साथीचे आजार हे डासांमुळे होतात. ज्या ठिकाणी घाणीचे साम्राज्य असते अशा ठिकाणी डासांची उत्पत्ती होते. शहरातील हे घाणीचे साम्राज्य कमी झाले की डासांचे प्रमाणही कमी होईल. प्रशासनाने शहरातील घाणीचे साम्राज्य कमी करण्यासाठी तसेच शहरात कचऱ्याचे ढीग पसरू नयेत यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न करायला हवेत. तसेच शहरात सर्वत्र औषध फवारणी करावी. डेंग्यूला कारणीभूत ठरणारा एडिस इजिप्ती हा डास गोड्या पाण्यात राहतो. डेंग्यूचे डास पसरू नयेत यासाठी नागरिकांनीही काळजी घ्यावी. नागरिकांना आपल्या घराच्या परिसरात, छतावर, भांड्यामध्ये, जुन्या वस्तूंमध्ये पाणी साचणार नाही याची काळजी घ्यावी. आपल्या घराचा परिसर स्वच्छ राहील याची काळजी सर्व नागरिकांनी घ्यावी. आठवड्यातील एक दिवस कोरडा दिवस पाळावा. याशिवाय नागरिकांनी सकस आहार घेणे, भरपूर पाणी पिणे, ज्यूस पिणे, नियमित व्यायाम करणे, अराम करणे, पुरेशी झोप घेणे आवश्यक आहे. कोणताही आजार किरकोळ आजार आहे असे समजून अंगावर काढणे धोकादायक ठरू शकते. नागरिकांनी आजाराची लक्षणे दिसताच डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. नागरिकांनी वैयक्तिक स्वच्छतेपासून सार्वजनिक स्वच्छतेपर्यंत विशेष काळजी घ्यावी. सरकारने प्रिंट मीडिया, इलेक्ट्रॉनिक मीडिया, सोशल मीडियाद्वारे याबाबत जनजागृती करावी. शाळा महाविद्यालयातही याबाबतीत प्रबोधन करावे. वैयक्तिक, सामूहिक व शासकीय पातळीवर व्यापक प्रयत्न करूनच साथीच्या आजाराशी दोन हात करता येईल.

# शेतकऱ्यांसाठी आंनदाची बातमी..... सन २०२४ - २५ खरीप हंगामातील १२७ कोटी ५० लाख रुपयांची नुकसान भरपाई शेतकऱ्यांच्या खात्यात होणार जमा

## केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांचा सातत्याने सुरु आहे पाठपुरावा

**दैनिक आपला विदर्भ**



**बुलढाणा/प्रतिनिधी:** प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत सन २०२४ -२५ खरीप हंगामाकरीता बुलढाणा जिल्हयातील शेतकऱ्यांना १२७ कोटी ५० लाख रुपये मंजूर झाले असून रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा व्हायला सुरुवात झाली आहे केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे शेतकऱ्यांना नुकसान भरपाईच्या रकमेत वाढ झाली असुन ही रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणार आहे.

प्रधानमंत्री पीक विमा जिल्हयातील अनेक शेतकरी या पीक विम्यापासुन वंचीत राहले होते. केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिग चव्हान यांच्यासोबत चर्चा केली पीक विमा कंपनीच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक घेवून पीक विम्याची रक्कम नुकसानी दाव्यानुसार शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाली पाहीजे. असे निर्देश पीक विमा कंपनीच्या अधिकाऱ्यांना देण्यात आले. त्यानुसार प्रधानमंत्री पीक विमा योजना खरीप हंगाम २०२४-२५ अंतर्गत बुलढाणा जिल्ह्यातील एकूण ६,२८,८०,५१,५३,९४२.९१ (सहाशे अठ्ठावीस कोटी, ऐंशी लाख, एकावन्न हजार, पाचशे त्रेचाळीस रुपये) इतकी नुकसान भरपाई मंजूर (एकूण ४,७६,३९२ शेतकऱ्यांना मंजुर आहे .या मदतीपैकी, ₹३,३०,५४,८३,९२५.८० (तीनशे तीस कोटी, चोपन्न लाख, त्र्याऐंशी हजार, नऊशे पंचवीस रुपये) इतकी रक्कम यापूर्वीच २,२८,६३६ शेतकऱ्यांना वाटप करण्यात आली आहे, सप्टेंबर २०२५ मध्ये वाटप होणारी नुकसान भरपाई १,२७,५०,२३,६८०.८२ (एकशे सत्तावीस कोटी, पन्नास लाख, तेवीस हजार, सहाशे ऐंशी रुपये मंजुर झाली आहे या मध्ये जिल्हयातील ८९,६२९ शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळणार आहे तालुकानिहाय वितरित होणारी पिक विम्याची मदत याप्रमाणे आहे

चिखली तालुक्यातील २,५११० शेतकऱ्यांना ३७,१७,५९,८५६.८६ इतकी सर्वाधिक रक्कम मंजूर झाली आहे. मेहकर तालुक्यातील २०,५८१ शेतकऱ्यांना २५,८८,३८,०८८.१५ इतकी मोठी रक्कम मिळणार आहे.

सिंदखेड राजा तालुक्यातील ९,५१० शेतकऱ्यांना १७,३४,९०,९९५.५५ रुपये मंजूर झाले आहेत. खामगांव: ३,९४२ शेतकऱ्यांना १०,२१,९४,२७२.६० इतकी मदत मिळणार आहे.

नांदुरा तालुक्यातील ९,७०८ शेतकऱ्यांसाठी ८,७७,५५,५३५.३२ रुपयांची रक्कम मंजुर झाली आहे.

लोणार: ९,४१८ शेतकऱ्यांना ७,२४,७०,९८७.०० इतकी मदत मिळणार आहे बुलढाणा: ३,६६८ शेतकऱ्यांना ६,६५,०२,३०६.२० मंजूर झाले आहेत.

मोताळा तालुक्यातील २,४९१ शेतकऱ्यांना ४,००,०७,६३१.०१ ही रक्कम पिक विम्याची मिळणार आहे देऊळगांव राजा २,५२० शेतकऱ्यांना २,८५,३८,४९८.७४ मंजूर झाले आहेत.

जळगांव जामोद तालुक्यातील १,०८८ शेतकऱ्यांना २,५५,५२,३५१.७७ ही रक्कम पिक विम्याची मिळणार आहे शेगांव तालुक्यातील ७५६ शेतकऱ्यांना २,२७,०२,२६४.८३ इतकी मदत मिळणार आहे.

संग्रामपूर तालुक्यातील ६१२ शेतकऱ्यांना १,९२,३८,९७५.५५ मंजूर झाली आहे मलकापूर तालुक्यातील २२५ शेतकऱ्यांना ५९,७१,९१७.२५ ही रक्कम मिळणार आहे

ही नुकसान भरपाईची रक्कम सप्टेबरच्या पहिल्या आठवडयात शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होत आहे याशिवाय राज्य शासनाकडे जिल्हयातील प्रलंबित दाव्या संदर्भातही कृषि मंत्र्यांकडे पाठपुरावा करण्यात येत असुन ही प्रकरणेही मंजूर झाल्यानंतर नुकसानीच्या रकमेत वाढ होणार आहे. त्याचा फायदा बुलढाणा जिल्हयातील शेतकऱ्यांनी पिक विमा संदर्भात तालुकास्तरीय पिक विमा कार्यालयाशी संपर्क साधावा कसे आवाहन केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या जनसंपर्क कार्यालयाच्यावतीने करण्यात आले

# गुणवत्तापूर्ण शिक्षणव्यवस्था लोकाभिमुख करण्यावर भर !

शिक्षण हे समाजाच्या सर्वांगीण विकासाचे आणि राष्ट्राच्या प्रगतीचे मूळ आहे. शिक्षणामुळे केवळ ज्ञानसंपादन होत नाही तर आत्मविश्वास, व्यक्तिमत्त्व विकास, सामाजिक जबाबदारी आणि आर्थिक स्वावलंबनाची वाट खुली होते. म्हणूनच शासनाने ''शिक्षण सर्वांसाठी'' हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून प्रत्येक घटकातील विद्यार्थ्यांना समान संधी देण्यासाठी राज्य शासनाने विविध योजना आणि सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. शिक्षण हे केवळ ज्ञानप्राप्तीचे साधन नसून समाजपरिवर्तनाचे शक्तिशाली साधन आहे. आजच्या युगात शिक्षण व्यवस्थेला विद्यार्थ्यांच्या गरजा, स्वप्ने आणि क्षमतांशी जोडणे ही काळाची गरज आहे. या जाणिवेतून शासनाने शिक्षण व्यवस्था लोकाभिमुख करण्यासाठी अनेक ठोस पावले उचलली आहेत. विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला, संशोधन वृत्तीला आणि कौशल्यविकासाला चालना देणारे उपक्रम राबवले जात आहेत.

**अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशांकरिता एसईबीसी व ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यास मुदतवाढ**

राज्य शासनाने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताचा विचार करून अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. राज्यात २६ फेब्रुवारी २०२४ पासून सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागासवर्ग () आरक्षणाची अंमलबजावणी सुरू करण्यात आली. या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशासाठी तसेच शासकीय सेवांमधील सरळसेवेसाठी १० टक्के आरक्षण देण्यात आले आहे. यानंतर मा. न्या. शिंदे समितीच्या शिफारशीनुसार मराठा समाजातील काही विद्यार्थ्यांना कुणबी, कुणबी-मराठा किंवा मराठा-कुणबी जातीचे म्हणजेच इतर मागास वर्ग प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र मिळाले आहे. मात्र या विद्यार्थ्यांपैकी अनेकांना जातवैधता प्रमाणपत्र तातडीने न मिळाल्याने प्रवेश प्रक्रियेत अडचणी येत होत्या. या पार्श्वभूमीवर राज्यशासनाने अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षातील प्रवेशांकरिता एसईबीसी व ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सुरुवातीला सहा महिने, त्यानंतर तीन महिन्यांची मुदतवाढ दिली होती. तरी देखील काही विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र मिळवण्यास अडचणी येत आल्याचे निर्दर्शनास आले आणि अनेक विद्यार्थांनी तक्रारी केल्या होत्या याची राज्य शासनाने दखल घेऊन पुन्हा तीन महिन्यांची अतिरिक्त मुदतवाढ दिली आहे.

याशिवाय, सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशांसाठी सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागासवर्ग () व ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सहा महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली आहे. यामुळे विद्यार्थ्यांचे प्रवेश जातवैधता प्रमाणपत्रांच्या अभावी त्यांचे प्रवेश रद्द होणार नाहीत आणि शैक्षणिक नुकसान टळणार आहे.

**तंत्रशिक्षणातील प्रवेशांची आकडेवारी (२०२४-२५)**

सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागासवर्ग आरक्षणाच्या अंमलबजावणीनंतर राज्यातील तंत्रशिक्षण संस्थांमध्ये मराठा विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणावर प्रवेश घेतले आहेत.

**तंत्रशिक्षणातील प्रवेशांची आकडेवारी (२०२४-२५)**

पदवी : १७ हजार ७७८, पदव्युत्तर : १ हजार ९२७, डिप्लोमा : ७ हजार ३५४ म्हणजेच एकूण २७ हजार ०५९ विद्यार्थी यांनी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये आरक्षणाअंतर्गत प्रवेश घेतलेला आहे.

**डॉ. पंजाबराव देशमुख सारथी देशांतर्गत उच्च शिक्षण शिष्यवृत्ती योजना**

राज्यातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा प्रवर्गातील जे गुणवंत विद्यार्थी पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी मान्यता प्राप्त २०० शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेतील अशा पात्र ३०० विद्यार्थ्यांना प्रतीवर्षी देशांतर्गत शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते. ही



योजना छत्रपती शाहू महाराज व मानव विकास संस्था (सारथी), पुणे या शासनाच्या संस्थेमार्फत ''डॉ. पंजाबराव देशमुख सारथी देशांतर्गत उच्च शिक्षण शिष्यवृत्ती योजना'' या नावाने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून राबविण्यात येत आहे. यामध्ये मराठा, कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा आणि कुणबी-जातीच्या विद्यार्थ्यांसाठी राज्य शासनाने सुरु केलेली डॉ. पंजाबराव देशमुख सारथी देशांतर्गत उच्च शिक्षण शिष्यवृत्ती योजना ही विद्यार्थ्यांसाठी आशेचा किरण ठरत आहे. सन २०२२-२३ पासून या योजनेद्वारे विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी आर्थिक पाठबळ मिळू लागले असून, उच्च शिक्षणाचे प्रमाण वाढत असून शिक्षणाचा दर्जा वाढविण्यास मदत होत आहे.

या योजनेअंतर्गत राज्यातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा व कुणबी जातीतील आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांना देशांतर्गत उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती दिली जाते. विद्यार्थ्यांना केवळ शुल्क सहाय्यच नव्हे, तर वसतिगृह, पुस्तके, अभ्यास साहित्य, प्रवास भत्ता आदी विविध सुविधा पुरवल्या जातात.यामुळे मराठा, कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा व कुणबी जातीतील गरीब व हुशार विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यास प्रोत्साहन.आणि आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक जगात उभे करण्यासाठी शैक्षणिक मदत होऊन उच्च व तांत्रिक शिक्षण घेताना होणारा आर्थिक खर्चही कमी होतो त्यामुळे उच्च शिक्षणात विद्यार्थांचे प्रमाण वाढते.

**छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती**

मराठा, कुणबी, कुणबी-मराठा, मराठा-कुणबी लक्षित गटातील पीएच.डी. करणाऱ्या गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्तीच्या माध्यमातून विशेष प्रोत्साहन देण्याकरिता सन २०१९ या वर्षापासून छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती () सुरु करण्यात आली आहे. सदर छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती अंतर्गत लक्षित गटातील ३०७८ विद्यार्थ्यांना सारथी संस्थेद्वारे सन २०२३ पर्यंत अधिछात्रवृत्ती मंजूर करण्यात आली आहे.आज रोजी पर्यंत ३९३ विद्यार्थ्यांची पुर्ण झाली असून ११० विद्यार्थ्यांना विविध ठिकाणी नोकरी लागली आहे. या विद्यार्थ्यांपैकी २३ विद्यार्थ्यांना त्यांच्या संशोधन विषयात पेटंट मिळाला आहे.

**विद्यार्थ्यांना देण्यात येणारी विद्यापीठ अनुदान आयोगाप्रमाणे अधिछात्रवृत्ती**

प्रमाणे (प्रथम ०२ वर्ष) एकूण प्रती वर्ष रक्कम अधिछात्रवृत्ती निकषा नुसार ५ लाख ५३ हजार ३००, एकूण प्रती माह अधिछात्रवृत्ती ४६ हजार १०८ आहे.

तसेच प्रमाणे (२ वर्षानंतर पुढील ०३ वर्ष) एकूण प्रती वर्ष रक्कम अधिछात्रवृत्ती ६ लाख २९ हजार ८००, एकूण प्रती माह अधिछात्रवृत्ती ५२ हजार ४८३ देण्यात येते. अधिछात्रवृत्ती अंतर्गत अंतिमरित्या निवड झालेल्या उमेदवारांना आर्थिक सहाय्य हे सारथीकडून ज्या रोजी अवार्ड लेटर दिले जाईल, त्या तारखेपासून पुढे पीएच.डी. करिता पाच वर्ष किंवा उमेदवार संशोधनासाठी विद्यापीठ महाविद्यालय/संस्था येथे रुजू झालेला असेल. (विद्यापीठ/महाविद्यालय/संस्थेच्या अहवालातील नमूद रुजू तारीख), या वेळी जी नंतरची तारीख असेल त्या तारखेपासून उमेदवाराच्या फक्त उर्वरित कालावधीसाठी पीएच.डी. च्या फक्त उर्वरित कालावधीसाठी एकुण ५ वर्षांच्या कालावधीच्या आधारे किंवा उमेदवारांनी ज्या तारखेस संशोधन अहवाल () सादर केला असेल, यापैकी जी अगोदरची तारीख असेल त्या तारखेपर्यंत अनुज्ञेय राहील. निवड झालेल्या लाभार्थ्यांना रक्कमे संदर्भात विद्यापीठ अनुदान आयोगाप्रमाणे अंतर्गत होणाऱ्या बदलानुसार अधिछात्रवृत्ती अनुज्ञेय राहील.

अधिछात्रवृत्ती योजनेअंतर्गत सन २०१९ मध्ये पात्र विद्यार्थी ५०३, पीएचडी घेतलेले विद्यार्थी २४६, नोकरी लागलेले विद्यार्थी ७४ आहेत. सन २०२० मध्ये पात्र विद्यार्थी २०४, पीएचडी घेतलेले विद्यार्थी ८०, नोकरी लागलेले विद्यार्थी १८ आहेत. सन २०२१ मध्ये पात्र विद्यार्थी ५५१, पीएचडी घेतलेले विद्यार्थी ६४, नोकरी लागलेले विद्यार्थी १० आहेत. सन २०२२ मध्ये पात्र विद्यार्थी ८५१, पीएचडी घेतलेले विद्यार्थी ४, नोकरी लागलेली विद्यार्थी १ आहेत. सन २०२३ मध्ये पात्र विद्यार्थी ९६९ आहेत.

**परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती**

राज्यातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा या जातीच्या विद्यार्थ्यांना आर्थिक परिस्थितीमुळे उच्च शिक्षणासाठी परदेशातील नामांकित विद्यापीठामध्ये प्रवेश घेता येत नाही. विद्यार्थ्यांची गुणवत्ता असून आर्थिक परिस्थितीमुळे उच्च शिक्षणापासून वंचित रहावे लागते. मराठा, कुणबी, कुणबी-मराठा, मराठा-कुणबी जातीतील मुलामुलींना परदेशातील नामांकित विद्यापीठांमध्ये अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी परदेशी शिष्यवृत्ती योजना लागू करण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्यातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा प्रवर्गातील जे गुणवंत विद्यार्थी पदव्युत्तर पदवी/पदविका व पीएचडी अभ्यासक्रमासाठी मध्ये २०० च्या आत रॅन्कीग असलेल्या शैक्षणिक संस्था/विद्यापीठामध्ये गुणवत्तेनुसार प्रवेश घेतील अशा मराठा, कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा प्रवर्गातील एकत्रितपणे ७५ विद्यार्थ्यांना प्रतीवर्षी परदेशी शिष्यवृत्ती मंजूर करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे. सदरची योजना छत्रपती शाहू महाराज व मानव विकास संस्था (सारथी), पुणे या शासनाच्या संस्थेमार्फत ''सयाजीराव गायकवाड-सारथी गुणवंत मुला-मुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना'' या नावाने शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून राबविण्यात येत आहे.

सारथी संस्थेमार्फत राज्यातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा या लक्षित गटातील विद्यार्थ्यांकरिता डॉ. पंजाबराव देशमुख सारथी उच्च शिक्षण देशांतर्गत शिष्यवृत्ती सन २०२२-२३ पासून २०० शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेशित पात्र विद्याध्यर्थ्यांना ही शिष्यवृत्ती लागू करण्यात आली आहे.

महाराष्ट्रतील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा प्रवर्गातील जे गुणवंत विद्यार्थी पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी मान्यता प्राप्त २०० शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेतील अशा पात्र ३०० विद्यार्थ्यांना प्रतीवर्षी देशांतर्गत शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते. सदरची योजना छत्रपती शाहू महाराज व मानव विकास संस्था (सारथी), पुणे या शासनाच्या संस्थेमार्फत ''डॉ. पंजाबराव देशमुख सारथी देशांतर्गत उच्च शिक्षण शिष्यवृत्ती योजना या नावाने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून राबविण्यात येत आहे.

देशाच्या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंतर्गत भारतातील शिक्षण क्षेत्रात ऐतिहासिक परिवर्तनाची सुरुवात झाली आहे. देशातील एकूण नोंदणी गुणोत्तर ५०% पर्यंत नेण्याचे राष्ट्रीय उद्दिष्ट गाठण्यासाठी, भारताने जागतिक दर्जाचे शिक्षण आणि संशोधन भारतातच उपलब्ध करून देण्यासाठी धोरणात्मक पावले उचलली आहेत. महाराष्ट्रातही विविध अभिनव आणि परिवर्तनशील उपक्रम शिक्षण क्षेत्रात राबविले आहेत. यामध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि विद्यार्थ्यांपर्यंत संधींची समान उपलब्धता आणि संशोधनाला चालना यावर अधिक भर देऊन गुणवत्तापूर्ण शैक्षणिक बदल करून राज्यातील शिक्षण व्यवस्था लोकाभिमुख केली जात आहे.

**काशीबाई थोरात-धायगुडे**
विभागीय संपर्क अधिकारी
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
मंत्रालय, मुंबई -३२

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले.
मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत यांच्या उपस्थितीत १७ सामंजस्य करार

## महाराष्ट्राचा विविध कंपन्यांशी ३४ हजार कोटींचा गुंतवणूक करार; ३३ हजार रोजगार निर्मिती

**मुंबई/प्रतिनिधी:** श्री गणेशोत्सवाच्या शुभमुहूर्तावर महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक होत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्योग व मराठी भाषा मंत्री डॉ. उदय सामंत यांच्या उपस्थितीत आज तब्बल १७ सामंजस्य करारांवर (चेण) स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. या करारांचे एकूण मूल्य सुमारे ३३,७६८.८९ कोटी रुपये असून, त्यातून राज्यात सुमारे ३३,४८३ रोजगारनिर्मिती होणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

या गुंतवणुकीत इलेक्ट्रॉनिक्स, पोलाद, सोलार, इलेक्ट्रिक बसेस व ट्रक्स, संरक्षण व त्यासंबंधित विविध क्षेत्रांचा समावेश आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील उत्तर महाराष्ट्र, पुणे, विदर्भ, कोकण अशा सर्वच भागांमध्ये उद्योग उभारणीची संधी उपलब्ध होणार आहे.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, गुंतवणूकदारांना महाराष्ट्रात सहज आणि सुरळीत अनुभव मिळावा यासाठी शासन वचनबद्ध आहे. सामंजस्य स्वाक्षरी करून न थांबता गुंतवणुकीच्या प्रत्येक टप्प्यावर राज्य शासन भागीदार म्हणून सोबत राहील. याबाबत कुठेही अडथळा येणार नाही.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी मैत्री पोर्टल या वन-स्टॉप संकल्पनेचा विशेष उल्लेख केला. उद्योगांसाठी जमीन, परवानग्या आणि इतर मंजुरी तातडीने मिळवून देण्याबाबत शासन प्रयत्नशील आहे.

ऊर्जाविषयक निर्णयांचा उल्लेख करताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्यात नुकताच ५ वर्षांचा मल्टी-इयर टॅरिफ मंजूर झाला आहे. वीजदर वर्षागणिक कमी होणार आहेत. पूर्वी दरवर्षी वीजदर ९ टक्क्यांनी वाढत असत, पण आता विजेचे दर कमी होणार आहेत. हे उद्योगांसाठी मोठे दिलासादायक ठरणार आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, उद्योग क्षेत्रातील गुंतवणुकीचा जीवनचक्र राज्य सरकारने स्थिर आणि अंदाजपत्रित ठेवण्याचे धोरण स्वीकारले आहे. त्यामुळे गुंतवणूकदारांचा विश्र्वास वृद्धिंगत होईल.



या करारान्वये (१) मे.ग्रॅफाईट इंडिया लि. (सिंथेटिक ग्रॅफाईट अनोड मटेरिअल) यांनी रू.४७६१ कोटी रूपयांची गुंतवणूक केली असून याद्वारे ११६६ रोजगार निर्मिती होणार आहे. (२) मे.नेक्ट जनरेशन मॅन्युफॅक्चुरिंग प्रा.लि. (इलेक्ट्रॉनिक्स) (रू.१००० कोटी गुंतवणूक आणि १००० रोजगार निर्मिती), (३) मे.युरोबस भारत प्रा.लि., (इलेक्ट्रीक बस आणि पायाभूत सुविधा प्रकल्प)(रू.४२०० कोटी गुंतवणूक आणि १२००० रोजगार निर्मिती), (४) मे.व्हिर्च्यसो ऑप्टोइलेक्ट्रॉनिक्स प्रा.लि. (इलेक्ट्रॉनिक्स)(रू.८०० कोटी गुंतवणूक आणि ५०० रोजगार निर्मिती), (५) मे.युनो मिंडा टो इनोव्हेशन प्रा.लि. (इलेक्ट्रॉनिक्स) (रू.१६५० कोटी गुंतवणूक आणि १४५० रोजगार निर्मिती), (६) मे.इनर्जी इन मोशन प्रा.लि. (इलेक्ट्रीकल ट्रक)(रू.१०६५ कोटी गुंतवणूक आणि ४५० रोजगार निर्मिती), (७) मे.जनरल पॉलिफिल्म प्रा.लि., (फिल्स)(रू.११०० कोटी आणि २०० रोजगार निर्मिती), (८) मे.पीएस स्टील ण्ड पॉवर प्रा.लि.(स्टिल) (रू.१००० कोटी गुंतवणूक आणि ४३० रोजगार निर्मिती), (९) मे.बीएसएल सोलर लि.(सोलर) (रू.४५२९.८९ कोटी आणि ३५८२ रोजगार निर्मिती, (१०) मे.सुफ्लॅम मेटल्स प्रा.लि. (स्टिल)(रू.१००० कोटी गुंतवणूक आणि १४३० रोजगार निर्मिती), (११) मे.सुफ्लॅम इंडस्ट्रीज प्रा.लि. (स्टिल)(रू.११०० कोटी गुंतवणूक आणि १४३० रोजगार निर्मिती), (१२) मे.कितीसागर मेटॅलॉईड प्रा.लि. (स्टिल)(रू.१४१२ कोटी गुंतवणूक आणि ८४५ रोजगार निर्मिती), (१३) मे.गोदरेज ण्ड बायस मॅन्युफॅक्चरिंग कं.लि. (संरक्षण क्षेत्र) (रू.१५०० कोटी गुंतवणूक आणि ५०० रोजगार निर्मिती), (१४) मे.सेरम ग्रुप ऑफ कंपनीज (सेरम इन्स्टिटट्यूट आणि रायझिंग सन सह)(जैव तंत्रज्ञान)(रू.५००० कोटी आणि ३००० रोजगार निर्मिती), (१५) अंबुजा सिमेंट लि.(सिमेंट) (रू.१००० कोटी गुंतवणूक आणि ३००० रोजगार निर्मिती), (१६) पॅरासन मशिनरी इंड प्रा.लि. (संरक्षण क्षेत्र)(रू.१००० कोटी गुंतवणूक आणि ३००० रोजगार निर्मिती) आणि (१७) मे.आर्सेलर मित्तल जीसीसी प्रा.लि. यांनी जीसीसी क्षेत्रात रू.५१ कोटी रूपयांची गुंतवणूक करार केला असून याद्वारे १००० रोजगार निर्मिती होणार आहे.या सामंजस्य करारांवेळी मुख्य सचिव राजेश कुमार, उद्योग सचिव डॉ.पी. अन्बळगन, उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव नवीनकुमार सोना, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. वेलारासू, विकास आयुक्त दीपेंद्रसिंह कुशवाह आणि विविध कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## पान एक वरून..

### राज्यातलं सरकार इंग्रजांपेक्षा बेकार

त्याचवेळी मराठा आंदोलकांचा आज दिवसभरचा कार्यक्रम पाहता कडक नियम आणि अटी पोलिसांकडून लावण्यात आले आहेत.

''मनोज जरांगे पाटील यांनी आंदोलनासाठी पुन्हा परवानगीसाठी अर्ज केला आहे. कायद्याच्या चौकटीत राहून प्रशासन निर्णय घेणार आहे. आंदोलनाच्या बाबतीतही मार्ग काढण्यासाठी सरकार प्रयत्न करत आहे. कायदेशीर मार्ग काढावे लागतील. आम्ही देखील मंत्रिमंडळ उपसमितीच्या संपर्कात आहोत. यातून ठोस मार्ग काढण्याचा प्रयत्न आहे. दोन समाज एकमेकांसमोर उभे राहिले जातीत, अशी परिस्थिती नकोय. त्यामुळं दोन्ही समाजाला न्याय द्यावा लागेल,'' अशी भूमिका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केली.

''मराठा समाजासाठी जे जे करता येईल ते आम्ही करत आहोत. ओबीसीमधून मराठा समाजाला आरक्षण द्यावं, असे कोणाचीच भूमिका नाही. यांचे काढून त्यांना देणं हे करता येणार नाही. कायद्यानुसार जे आहे ते मराठा समाजाला दिले जाईल. मी मुख्यमंत्री असताना १० टक्के आरक्षण दिलं होतं. त्याचा फायदा आजही मराठा समाजाला होतोय. सारथीच्या माध्यमातून देखील अनेक योजना आणल्या व त्याचा फायदा मराठा समाजाला होतोय,'' असं म्हणत मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण देणं शक्य नसल्याचं विधान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलं.

उद्याच्या आंदोलनासाठी मनोज जरांगे पाटील यांच्यातर्फे पोलिसांनी पत्र देण्यात आलंय. पोलिसांनी आंदोलनासाठी मनोज जरांगे यांना आज एका दिवसाची परवानगी देण्यात आली होती. त्यामुळं पुन्हा एकदा परवानगीसाठी पत्र देण्यात आलं आहे.

मराठा आंदोलक मंत्रालयाच्या बाहेरही दाखल झाले आहेत. मंत्रालयासमोर मोठ्या प्रमाणावर घोषणाबाजी सुरू आहे. आंदोलक आपल्या मागण्या स्पष्टपणे मांडत असून, सरकारकडून ठोस निर्णयाची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

मराठ्यांना आतापर्यंत वापरुन घेतलं. न्याय मागण्यासाठी मराठी माणूस सूरतला जाणार का? मराठी माणूस न्याय मागण्यासाठी मुंबईतचं येणार, असं उद्धव ठाकरे म्हणाले. मुंबई मराठी लोकांची राजधानी आहे. आंदोलक दहशतवादी नाहीत, मराठी माणसं आहेत. सत्ता आल्यास काही दिवसांत न्याय देऊ म्हणणारे आता सत्तेत आहेत. सरकारनं हा प्रश्न सोडवला पाहिजे, असं उद्धव ठाकरेंनी आज पत्रकार परिषद घेऊन सांगितलं.

### मराठ्यांच्या प्रश्नावर सरकार

आंदोलनाच्या बाबतीतही मार्ग काढण्यासाठी सरकार प्रयत्न करत आहे. कायदेशीर मार्ग काढावे लागतील. आम्ही देखील मंत्रिमंडळ उपसमितीच्या संपर्कात आहोत. यातून ठोस मार्ग काढण्याचा प्रयत्न आहे. दोन समाज एकमेकांसमोर उभे राहिले जातीत, अशी परिस्थिती नकोय. त्यामुळं दोन्ही समाजाला न्याय द्यावा लागेल,'' अशी भूमिका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केली.

**राजकीय पोळी भाजण्याचा प्रयत्न करू नका**

''आम्ही जेवढा न्याय मराठा समाजाला दिला तेवढा कोणत्याच सरकारनं दिला नाही. मराठा समाजाबद्दल आम्ही सकारात्मक आहोत. या समाजाच्या पाठिशी आम्ही आहोत. काही लोक जाणीवपूर्वक भडकवण्याचा प्रयत्न करत आहेत. आंदोलनावरुन राजकीय पोळी भाजण्याचा प्रयत्न करु नका,'' असं आवाहन मुख्यमंत्री फडणवीस यांनी विरोधकांना केलं आहे.

# मुलीस फूस लावून पळवणारा आरोपी जालना पोलिसांच्या जाळ्यात

## चाकण, पुणे येथून दोघांना ताब्यात घेतले

दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी:** आष्टी पोलीस ठाण्याच्या हद्दीत २८ एप्रिल २०२१ रोजी घडलेल्या अल्पवयीन मुलगी फूस लावून पळवून नेण्याच्या प्रकरणातील आरोपीला अखेर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष जालना यांच्या तपासात ही मोठी कारवाई करण्यात आली.

आष्टी येथून एका अल्पवयीन मुलीस फूस लावून सेलगाव, ता. परतूर येथील रहिवासी आरोपीने पळवून नेले होते. यासंदर्भात पीडित मुलीच्या कुटुंबियांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला होता. मात्र, बराच काळ उलटून गेला तरी मुलगी व आरोपी यांचा काहीही थांगपत्ता लागला नव्हता. त्यामुळे



गुन्ह्याचा तपास अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाकडे वर्ग करण्यात आला. जालना पथकाने तांत्रिक विश्लेषणासोबतच गुप्त बातमीदारांच्या मदतीने तपासाची व्याप्ती वाढवली. तपासातून आरोपी व मुलगी हे चाकण, ता. खेड, जि. पुणे येथे राहत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी चाकण येथे धाड टाकून दोघांना ताब्यात घेतले. सध्या दोघांनाही पोलीस स्टेशनला आणून पुढील चौकशी सुरू असून, याप्रकरणाचा अधिक तपास सुरू आहे.

## ४८ वर्षीय तमिळ अभिनेता विशाल अन् अभिनेत्री साई धनशिकाचा साखरपुडा संपन्न, इन्स्टाग्रामवरुन दिली माहिती

**मुंबई/प्रतिनिधी:** तमिळ अभिनेता विशालने अभिनेत्री साई धनशिका यांचा साखरपुडा संपन्न झालाय. याबाबतची माहिती स्वतः विशालने सोशल मीडिया पोस्टद्वारे दिली. अभिनेता विशाल याने त्याच्या साखरपुड्याचे फोटो इन्स्टाग्रामवर शेअर केले आहेत.

इंस्टाग्रामवर साखरपुड्याचे फोटो शेअर करताना अभिनेता विशाल म्हणाला,''या विश्वाच्या कानाकोपऱ्यातून माझ्या खास वाढदिवसाला शुभेच्छा आणि आशीर्वाद देण्यासाठी आलेल्या सर्व प्रियजनांचे आभार. आज साई धनशिकासोबत झालेल्या माझ्या साखरपुड्याची आनंदवार्ता माझ्या कुटुंबासोबत शेअर करताना मला खूप आनंद होत आहे. मी खूप खुश आहे. नेहमीप्रमाणे तुमचे आशीर्वाद आणि शुभेच्छा माझ्यावर राहोत, हीच इच्छा आहे.''

विशाल आणि साई धनशिकाने याच वर्षी मे महिन्यात एका कार्यक्रमात साखरपुड्याची घोषणा केली होती. हा दिवस खास होता कारण याच दिवशी विशालचा वाढदिवसही असतो. दोघे एकमेकांना मागील १५ वर्षांपासून ओळखतात आणि चांगले मित्रही आहेत. साखरपुड्याबरोबरच विशाल आणि साई धनशिकाच्या वयातील अंतरही चर्चेत आले. आपल्या या वाढदिवशी विशाल ४८ वर्षांचा झाला आहे, तर धनशिकाचे वय सध्या ३५ आहे. २० नोव्हेंबर १९८९ रोजी जन्मलेली साई धनशिका यावर्षी नोव्हेंबरमध्ये ३६ वर्षांची होणार आहे. म्हणजेच दोघांमध्ये १२ वर्षांपेक्षा जास्त वयाचे अंतर आहे.

विशाल साऊथ फिल्म इंडस्ट्रीतील प्रसिद्ध अभिनेता आहे. तो प्रामुख्याने तमिळ इंडस्ट्रीत सक्रिय आहे. त्याचे पूर्ण नाव विशाल कृष्ण रेड्डी असले तरी तो विशाल या नावानेच ओळखला जातो.

# इस्लाम प्राचीन काळापासून आहे आणि नेहमीच राहील : भागवत

दैनिक आपला विदर्भ



**नागपूर/प्रतिनिधी:** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे (आरएसएस) प्रमुख मोहन भागवत यांनी हिंदू-मुस्लिम ऐक्यावर भर दिला आहे. मोहन भागवत यांनी सांगितले की इस्लामला भारतात नेहमीच स्थान असेल. ते म्हणाले की हिंदू आणि मुस्लिम एकसारखे आहेत, फक्त त्यांची उपासना करण्याची पद्धत वेगळी आहे, म्हणून त्यांच्यातील एकतेबद्दल कोणताही प्रश्र्न उपस्थित केला जाऊ नये. त्यांनी हिंदू आणि मुस्लिमांमध्ये परस्पर विश्र्वास राखण्यासाठी जोरदार समर्थन केले. मोहन भागवत यांनी आरएसएसच्या शताब्दी सोहळ्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात भाग घेतला, जिथे त्यांनी एका प्रश्र्नाच्या उत्तरात हे सांगितले. ते म्हणाले, 'हिंदू आणि मुस्लिम एकसारखे आहेत. म्हणून त्यांच्यातील एकतेचा प्रश्र्नच उद्भवत नाही. फक्त त्यांची उपासना करण्याची पद्धत बदलली आहे. आपण आधीच एक आहोत. एकत्र आणणारी गोष्ट कुठून आली? काय बदलले आहे? फक्त उपासनेची पद्धत बदलली आहे; त्यामुळे खरोखर काही फरक पडतो का?'

मोहन भागवत म्हणाले की, 'इस्लाम प्राचीन काळापासून भारतात आहे आणि आजपर्यंत आहे आणि भविष्यातही राहील. इस्लाम राहणार नाही ही कल्पना हिंदू तत्वज्ञान नाही. हिंदू आणि मुस्लिम दोघांनाही एकमेकांवर परस्पर विश्र्वास असणे आवश्यक आहे.' ते असेही म्हणाले की, 'रस्ते आणि ठिकाणे 'आक्रमकांच्या' नावाने नसावीत. मी असे म्हटले नाही की मुस्लिम नावे असू नयेत. एपीजे अब्दुल कलाम, अब्दुल हमीद यांचे नाव तिथे असले पाहिजे.'

संघाचे प्रमुख मोहन भागवत म्हणाले की, संघ धार्मिक आधारावर कोणावरही हल्ला करण्यावर विश्र्वास ठेवत नाही आणि केरळ पूर आणि गुजरात भूकंप यासारख्या आपत्तींमध्ये सर्वांना मदत करण्यासाठी नेहमीच पुढे आला आहे. ते म्हणाले की धर्म हा वैयक्तिक निवडीचा विषय आहे आणि या प्रकरणात कोणत्याही प्रकारचे प्रलोभन किंवा जबरदस्ती नसावी असे त्यांचे मत आहे.

संघ प्रमुखांनी धर्मांतर आणि बेकायदेशीर स्थलांतर हे देशातील लोकसंख्याशास्त्रीय असंतुलनाचे प्रमुख कारण असल्याचे नमूद केले आणि ते म्हणाले की सरकार घुसखोरी रोखण्याचा प्रयत्न करत आहे आणि समाजानेही आपली भूमिका बजावली पाहिजे. मोहन भागवत म्हणाले की, नोकऱ्या बेकायदेशीर स्थलांतरितांकडे जाऊ नयेत तर आपल्या लोकांना मिळाव्यात, ज्यामध्ये मुस्लिमांचाही समावेश आहे.' मोहन भागवत म्हणाले की, बांगलादेश आणि भारतातील लोकांचा डीएनए सारखाच आहे या युक्तिवादाशी ते सहमत आहेत, परंतु प्रत्येक देशाचे स्वतःचे नियम आणि कायदे आहेत आणि स्थलांतर करू इच्छिणाऱ्यांनी हे नियम पाळले पाहिजेत. भागवत यांनीही हिंसाचारात संघाचा सहभाग असल्याचा आरोप फेटाळून लावला. ते म्हणाले, 'हिंसेत सहभागी असलेली कोणतीही संघटना भारतातील ७५ लाख ठिकाणी पोहोचू शकत नाही किंवा इतका पाठिंबा मिळवू शकत नाही. जर आपण असे असतो तर आपण असे कार्यक्रम आयोजित करू का? आपण कुठेतरी भूमिगत असतो.'

# खामगावात लवकरच ओपन जीम आणि जॉगिंग पार्कची निर्मिती

## राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त कामगार मंत्री ना. आकाश फुंडकर यांचा पुढाकार

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** : शहराच्या विकासाला नवी दिशा देत, नागरिकांच्या आरोग्य संवर्धनावर भर देण्यासाठी खामगाव शहरात लवकरच ओपन जीम आणि आकर्षक जॉगिंग पार्क उभारण्यात येणार आहेत. कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या पार्श्वभूमीवर या महत्वपूर्ण उपक्रमासाठी पुढाकार घेतला आहे. हे ओपन जिम खामगाव शहराचे सौंदर्य वाढवण्यासोबतच नागरिकांना निरोगी जीवनशैलीसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देतील. शहराला सुव्यवस्थित बनवण्याच्या दृष्टीनेही हा एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. या उपक्रमासंदर्भात नामदार फुंडकर यांनी तालुका क्रीडा अधिकारी लक्ष्मीशंकर यादव आणि नगर परिषद प्रशासक तथा मुख्याधिकारी डॉ. प्रशांत शेळके यांना आवश्यक निर्देश दिले आहेत. त्यांनी या प्रकल्पांसाठी तातडीने नियोजन सुरू करण्याचे आदेश दिले आहेत.

**शासकीय व खाजगी संस्थांचा सहभाग:** या प्रकल्पांची अंमलबजावणी तालुका क्रीडा संकुल समितीच्या सहकार्याने केली जाईल. विशेष म्हणजे, यासाठी केवळ शासकीय निधीवर अवलंबून न राहता, विविध सरकारी कार्यालये आणि खासगी संस्थांच्या योगदानातून हे आरोग्यवर्धक प्रकल्प उभे केले जाणार आहेत. यामुळे सार्वजनिक-खासगी भागीदारीचे एक उत्तम उदाहरण खामगावात पाहायला मिळेल. शहरातील मुख्य रस्त्यांवरील चौकांचे सुशोभिकरण केले जाईल आणि तेथे आकर्षक डिझाइनसह सौंदर्याला नवा स्पर्श दिला जाईल. त्याचबरोबर, शहरातील मोकळ्या जागांवर आणि लेआउटमधील ओपन स्पेसमध्ये हिरवळ आणि जॉगिंग पार्क विकसित केले जातील, ज्यामुळे शहरातील वातावरण अधिक सुखद होईल. या उद्यानांचे आणि ओपन जीमचे व्यवस्थापन आणि देखभाल करण्याची जबाबदारी इच्छुक असलेल्या शासकीय, निमशासकीय आणि खासगी संस्थांकडे सोपवली जाईल. यातून, प्रकल्पांची दीर्घकाळ देखभाल सुनिश्चित होईल आणि नागरिकांना या सुविधांचा सातत्याने लाभ घेता येईल.



**राष्ट्रीय क्रीडा दिनाचे महत्त्व:** दरवर्षी २९ ऑगस्ट रोजी साजरा होणाऱ्या राष्ट्रीय क्रीडा दिनाचे महत्त्व या घोषणेमुळे अधिक अधोरेखित झाले आहे. हा दिवस हॉकीचे जादूगार म्हणून ओळखले जाणारे मेजर ध्यानचंद यांचा जन्मदिन आहे. या दिवशी देशभरात खेळांना प्रोत्साहन देण्यासाठी विविध स्पर्धा, मॅरेथॉन आणि खेळाडूंच्या सन्मान सोहळ्यांचे आयोजन केले जाते. क्रीडा संस्कृती रुजविणे आणि खेळाडूंच्या योगदानाचा गौरव करणे हा या दिवसाचा मुख्य उद्देश आहे. खामगावमधील या उपक्रमामुळे या दिवसाचा उद्देश अधिक सार्थक होईल.

खामगावात सुरू होणाऱ्या या अभिनव उपक्रमामुळे शहरातील नागरिकांना शारीरिक व्यायामासाठी उत्तम व्यासपीठ मिळेल. धावणे, चालणे आणि इतर शारीरिक हालचालींसाठी सुरक्षित आणि स्वच्छ जागा उपलब्ध होतील. यामुळे नागरिकांचे आरोग्य सुधारण्यास मदत होईल आणि शहराच्या एकूण सौंदर्यातही भर पडेल. या प्रकल्पांमुळे खामगावकरांच्या जीवनशैलीत एक सकारात्मक बदल घडेल, अशी आशा व्यक्त केली जात आहे.

# शैक्षणिक धोरणात योगदान देणाऱ्या आमदाराची विद्यापीठ सिनेटवर निवड

## आ. सिद्धार्थ खरात यांची संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या सिनेट सदस्यपदी नियुक्ती

## शैक्षणिक धोरणात अनुभवाला मिळणार हक्काची जागा



**दैनिक आपला विदर्भ**

**मेहकर/प्रतिनिधी:** मेहकर विधानसभा मतदारसंघाचे आमदार मा. सिद्धार्थ खरात यांची संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावतीच्या सिनेट सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ अंतर्गत नियम २८(१) (w) नुसार ही नियुक्ती विधानसभेचे अध्यक्ष मा. राहुल नार्वेकर यांच्या स्वाक्षरीने करण्यात आली असून, दोन विधानसभा सदस्यांची सिनेटसाठी निवड करण्याचा अधिकार विधानसभेच्या अध्यक्षांकडे आहे.

या नियुक्तीचे विशेष महत्त्व हे आहे की, आमदार सिद्धार्थ खरात यांनी सन २०१५-१६ मध्ये मंत्रालयात उच्च व तंत्र शिक्षण विभागात सहसचिव पदावर कार्यरत असताना, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ च्या संकल्पनेपासून ते अंमलबजावणीपर्यंत अत्यंत मोलाचे योगदान दिले होते. याच अधिनियमाच्या आधारे आज राज्यातील विद्यापीठ व्यवस्थापन, शैक्षणिक गुणवत्ता, अभ्यासक्रमांची पुनर्रचना, कौशल्य विकास आणि रोजगाराभिमुख शिक्षणाला नवे आयाम मिळाले आहेत.

राजकीय आणि प्रशासकीय दोन्ही क्षेत्रात प्रगल्भ अनुभव असलेल्या व्यक्तीची विद्यापीठ सिनेटवर नियुक्ती होणे हे शैक्षणिक क्षेत्रासाठी निश्चितच सकारात्मक पाऊल मानले जात आहे. सिनेट हे विद्यापीठातील धोरणात्मक निर्णय घेणारे सर्वोच्च मंडळ असून, अशा निर्णयांमध्ये आमदार खरात यांचा अनुभव, दूरदृष्टी आणि अभ्यास निश्चितच मोलाची भूमिका बजावेल, असा विश्वास व्यक्त होत आहे.

या नियुक्तीनंतर, विविध शैक्षणिक संस्था, सामाजिक संघटना आणि स्थानिक नागरिकांकडून आमदार सिद्धार्थ खरात यांचे अभिनंदन व स्वागत करण्यात येत आहे. शैक्षणिक क्षेत्रात गुणवत्ता आणि पारदर्शकता वाढविण्याच्या दृष्टीने त्यांचा पुढील वाटचाल कशी घडते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### आ. सिद्धार्थ खरात यांची अमरावती विद्यापीठाच्या सिनेटवर नियुक्ती

मेहकरचे आमदार सिद्धार्थ खरात यांची संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या सिनेट सदस्यपदी नियुक्ती झाली आहे. ही नियुक्ती विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ अंतर्गत केली आहे.

सिद्धार्थ खरात यांनी सन २०१५-१६ मध्ये उच्च व तंत्र शिक्षण विभागात सहसचिव पदावर काम करत असताना, या अधिनियमाच्या रचनेत मोलाचा वाटा उचलला होता. त्यामुळे आता त्यांचा प्रत्यक्ष शैक्षणिक धोरणनिर्मितीत सहभाग वाढणार असून, ही बाब शिक्षण क्षेत्रासाठी सकारात्मक मानली जात आहे.

### आ. सिद्धार्थ खरात यांची अमरावती विद्यापीठाच्या सिनेटवर नियुक्ती  शैक्षणिक धोरणात अनुभवाला मान्यता

मेहकर विधानसभा मतदारसंघाचे आमदार मा. सिद्धार्थ खरात यांची संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या सिनेट सदस्यपदी विधानसभेचे अध्यक्ष मा. राहुल नार्वेकर यांच्या आदेशाने नियुक्ती झाली आहे. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ च्या कलम २८(१)(w) नुसार विधानसभेतील दोन सदस्यांची निवड सिनेटसाठी केली जाते. सन २०१५-१६ मध्ये उच्च व तंत्र शिक्षण विभागात सहसचिव म्हणून कार्यरत असताना सिद्धार्थ खरात यांनी या अधिनियमाच्या निर्मितीत सक्रिय भूमिका बजावली होती. त्यांना असलेला प्रशासकीय आणि शैक्षणिक धोरणातील अनुभव आता प्रत्यक्ष विद्यापीठ धोरणनिर्मितीत वापरला जाणार आहे, याची नोंद शिक्षण क्षेत्रातील अनेक जाणकारांनी घेतली आहे.

## विविध वृत्त...

### शिक्षक पात्रता परीक्षाचे प्रमाणपत्रांचे वितरण १ ते ९ सप्टेंबर दरम्यान; उमेदवारांनी उपस्थित राहण्याचे आवाहन

**बुलढाणा/प्रतिनिधी:** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने दि. १० नोव्हेंबर २०२४ रोजी महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा घेण्यात आली होती. या परीक्षेचा अंतिम निकाल दिनांक १४ फेब्रुवारी २०२५ रोजी परिषदेकडून ऑनलाईन पद्धतीने जाहीर करण्यात आला होता. सदर परीक्षेत पात्र उमेदवारांची पात्रता प्रमाणपत्रे परीक्षा परिषदेकडून जिल्हा शिक्षणाधिकारी(प्राथमिक) कार्यालयास प्राप्त झाली असून, त्यांचे वितरण दि. १ ते ९ सप्टेंबर २०२५ या कालावधीत कार्यालयीन वेळेत होणार आहे. उमेदवारांनी प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी स्वतः उपस्थित राहावे, असे आवाहन शिक्षणाधिकारी(प्राथमिक) विकास पाटील यांनी केले आहे. बुलढाणा जिल्ह्यात शिक्षक पात्रता परीक्षा ११ केंद्रांवर घेण्यात आली होती. प्रमाणपत्र प्राप्त करताना उमेदवारांनी स्वतः हजर राहणे आवश्यक असून, त्यांना परीक्षा प्रवेशपत्र, गुणपत्रिका, डी.टी.एड/बी.एड उत्तीर्ण गुणपत्रक, आरक्षण प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र, दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र, माजी सैनिकांचा पुरावा (लागू असल्यास) तसेच आधार/पॅन/मतदार ओळखपत्र इत्यादी ओळखपत्रे सोबत आणणे बंधनकारक आहे. सदर कागदपत्रांशिवाय प्रमाणपत्र दिल्या जाणार नाही. तसेच बुलढाणा परीक्षा केंद्रांवर उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची पेपर-१ व पेपर-२ ची यादी जिल्हा परिषद बुलढाणा यांच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

### लोकशाही दिन २ सप्टेंबरला

**बुलढाणा/प्रतिनिधी:** दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिन आयोजित करण्यात येतो. त्यानुसार सप्टेंबर महिन्याचा लोकशाही दिन मंगळवार, दि. २ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी १ वाजता जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात घेण्यात येणार आहे. लोकशाही दिनासाठी तक्रारदारांनी उपस्थित राहावे, उपस्थित राहणे शक्य नसल्यास तक्रारी रजिस्टर पोस्टाने लोकशाही दिनाआधी जिल्हाधिकारी कार्यालयात पोहोचतील अशाप्रकारे पाठवावेत, असे प्र. निवासी उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार यांनी कळविले आहे.

### 'शालार्थ'च्या कागदपत्रांसाठी मुदतवाढ आता कधीपर्यंत सादर करावी लागणार?

**पुणे /प्रतिनिधी:** राज्यातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना शालार्थ आयडीबाबतची कागदपत्रे सादर करण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यानुसार आता १५ सप्टेंबरपर्यंत संबंधित कागदपत्रे सादर करता येणार आहेत. नागपूर विभागात बोगस शालार्थ आयडीचे प्रकरण उघडकीस आल्यानंतर शिक्षण विभागाने राज्यातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या शालार्थ आयडीबाबत नवी कार्यपद्धती लागू करण्याचा निर्णय घेतला. त्यात शिक्षकांच्या वैयक्तिक मान्यतांची २०१२ ते २०२५ या काळातील कागदपत्रे शालार्थ संकेतस्थळावर ३१ ऑगस्टपर्यंत अपलोड करणे, शालार्थ आयडीसाठी ई ऑफिस प्रणालीचा वापर करणे बंधनकारक करण्यात आले. तसेच वैयक्तिक मान्यतेमध्ये अनियमितता असल्यास फौजदारी कारवाईचे निर्देशही देण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर राज्यभरातील शासकीय, अनुदानित शाळांतील शिक्षकांना कागदपत्रांची जमवाजमव करावी लागत आहे. कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक महासंघाने कागदपत्रांच्या अनुपलब्धतेसह विविध तांत्रिक अडचणी निदर्शनास आणून देत मुदतवाढीची मागणी केली होती. शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह यांनी शालार्थ कागदपत्रे अपलोड करण्याबाबत विभागीय मंडळांचे अध्यक्ष, विभागीय शिक्षण उपसंचालक, शिक्षणाधिकारी, शिक्षण निरीक्षक, वेतन अधीक्षक यांना परिपत्रकाद्वारे सूचना दिल्या आहेत. त्यानुसार, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे नियुक्ती आदेश, वैयक्तिक मान्यता, रुजू अहवाल, शालार्थ मान्यतेचे आदेश इत्यादी कागदपत्रे शालार्थ प्रणालीमध्ये अपलोड करण्याच्या सूचना १६ जुलैच्या पत्राद्वारे देण्यात आल्या आहेत. सद्यस्थितीत खासगी शाळांतील ४५ टक्के काम काज पूर्ण झाले आहे. कागदपत्रे अपलोड करण्यास ३१ ऑगस्टपर्यंतची मुदत देण्यात आली आहे. या ऐवजी १५ सप्टेंबरपर्यंत डीडीओ-१ आणि मुख्याध्यापक यांच्याच लॉगीनमधून कागदपत्रे अपलोड करण्यास मुदतवाढ देण्यात येत आहे. कागदपत्रे अपलोड करण्यास विलंब होणार नाही याची दक्षता घ्यावी, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

# बंद पथदिव्यांवरून भाजपा आक्रमक, १५ दिवसांची अल्टीमेटम, अन्यथा धरणे आंदोलन

**दैनिक आपला विदर्भ**

**■ देवानंद सानप**

बिबी ; लोणार ऐतिहासिक आणि भौगोलिकदृष्ट्या महत्त्व असलेल्या लोणार शहराची सद्यस्थिती अत्यंत दयनीय झाली असून, शहर प्रशासनाच्या अकार्यक्षमतेमुळे नागरिकांचे जगणे कठीण बनले आहे. शहरातील अनेक भागांतील पथदिवे गेले कित्येक दिवस बंद असून, रात्रीच्या वेळी नागरिकांना भर पावसात अंधारात प्रवास करावा लागत आहे.

या पार्श्वभूमीवर २८ ऑगस्ट २०२५ रोजी भारतीय जनता पक्षाने नगरपालिकेला निवेदन देत १५ दिवसांची मुदतवाढ दिली आहे. त्या आत बंद पथदिवे सुरू करण्यात यावे आणि शहर विस्तारातील नवीन प्रभागांमध्ये नव्याने पथदिवे बसवावेत, अशी ठाम मागणी करण्यात आली. अन्यथा नगरपालिका कार्यालयात एकदिवसीय धरणे आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा भाजपा पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.

शहरातील समस्या दिवसेंदिवस गंभीर होत असून, मुख्याधिकारी व प्रशासकांच्या अकार्यक्षमता व निर्णयक्षमतेच्या अभावामुळे लोकांच्या समस्या ऐरणीवर आल्या आहेत. नुकतेच आमदार सिद्धार्थ खरात यांनीही मुख्याधिकाऱ्यांना झापल्याचा प्रसंग घडला होता. त्यानंतर प्रशासनात काहीसा खांदेपालट झाला, परंतु परिस्थिती सुधारण्याऐवजी आणखी बिघडली आहे.

महावितरणने बोरखेडी धरणाच्या वीजपुरवठ्यावर गंडांतर आणल्यामुळे पाणीटंचाईचे संकट देखील निर्माण झाले आहे. त्यातच शहरातील मुख्य रस्त्यांवरील पथदिवे बंद असल्यामुळे रात्रीच्या वेळेस नागरीकांना साप-विंचूंचा धोका, अपघातांचा संभाव आणि अनुचित प्रकार घडण्याची भीती सतावत आहे.



यावेळी भाजपा तालुका प्रभारी गजानन मापारी, शहराध्यक्ष शुभम बनमेरू, शुभम देसाई, निखिल मुलंगे तसेच इतर भाजप पदाधिकारी उपस्थित होते.

# अन्न व औषध प्रशासनाकडून गणेश मंडळे व नागरिकांसाठी मार्गदर्शक सूचना

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी:** आगामी गणेशोत्सव काळात मंडळे व नागरिकांनी प्रसाद, भंडारा व अन्नपदार्थांच्या सुरक्षिततेसाठी अन्न व औषध प्रशासनाने महत्त्वाच्या सूचना दिल्या आहेत. गणेश मंडळांनी Fssai.gov.in या संकेतस्थळावरील फोसकॉस (Foscos) पोर्टलवर नोंदणी करून प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक आहे. गणेशोत्सव काळात नागरिकांचे आरोग्य सुरक्षित राहावे, यासाठी या सर्व सूचनांचे काटेकोर पालन करणे आवश्यक असल्याचे आवाहन अन्न व औषध प्रशासनाने केले आहे.

**मार्गदर्शक सूचना याप्रमाणे**

प्रसाद व अन्नपदार्थ स्वच्छ पाण्याने, स्वच्छ भांड्यांत आणि स्वच्छ हाताने तयार करावेत, शिळे होणारे पदार्थ मोठ्या प्रमाणावर बनवून साठवू नयेत, प्रसाद स्वच्छ व कोरड्या स्वरूपात तयार करावा.

**कच्चा माल व घटकद्रव्ये**

तुप, तेल, दूध, खोबरे, पीठ इत्यादी पदार्थ नेहमी ताजे व प्रमाणित दर्जाचे असावेत, कच्चा माल केवळ FSSAI परवाना असलेल्या दुकानदारांकडूनच खरेदी करावा, खरेदीची बिले मागवून जतन करावीत, पॅकबंद वस्तूंवर FSSAI क्रमांक, उत्पादन तारीख व कालबाह्यता तारीख तपासावी, एकाच तेलात वारंवार तळणे टाळावे, भंडारा अथवा प्रसादासाठी ताजी फळे व भाज्या वापराव्यात.

**स्वयंपाक व वितरण पद्धत**

प्रसाद शक्यतो गरमागरम वाटावा, थंड पदार्थांसाठी शीतसाखळीचे पालन करावे, दूधापासून बनलेले पदार्थ १२ तासांतच वापरावेत, स्वच्छ व झाकलेल्या भांड्यांतून प्रसाद वाटावा, प्रसाद वाटताना हात स्वच्छ धुवावेत, शक्यतो हातमोजे व झाकलेली पात्रे वापरावीत, प्लास्टिकऐवजी पर्यावरणपूरक भांडी/पाने वापरावीत, केटरिंग सेवेकडून प्रसाद घेतल्यास त्यांचा परवाना तपासावा.

**आरोग्याची काळजी**

ताप, खोकला वा संसर्गजन्य आजार असलेल्या व्यक्तींनी अन्न तयार करणे व वाटप करणे टाळावे, प्रसादात कृत्रिम रंग, सुगंधी द्रव्ये वा घातक रसायनांचा वापर करू नये.

**साठवणूक व वाहतूक**

लवकर खराब होणारे पदार्थ थंड जागी वा शीतगृहात ठेवावेत, अन्न नेहमी झाकून ठेवावे, उरलेला प्रसाद फेकून न देता त्याचे योग्य व्यवस्थापन करावे.

# वसतिगृह प्रवेशापासून वंचित असलेल्या विद्यार्थ्यांनी आधार, स्वयंम योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन; ऑनलाईन अर्ज १८ सप्टेंबरपर्यंत मागविले

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी:** शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये शासकीय वसतीगृहापासून वंचित असलेल्या इतर मागास वर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना व पंडीत दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजनांचा लाभ घेण्यासाठी अर्ज मागविण्यात आले आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी १८ सप्टेंबर २०२५ पर्यंत ऑनलाईन अर्ज करावा, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहाय्यक संचालक मनोज मेरत यांनी केले आहे.

अर्जाची प्रक्रिया व निवड याद्या http://hmas.mahait.org या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने पार पडणार असून शासन निर्णयातील अटी व शर्ती लागू राहणार आहेत. इच्छुक विद्यार्थ्यांनी आपला अर्ज आवश्यक कागदपत्रांसह सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण जिल्हा कार्यालय, बुलढाणा येथे सादर करावा.

पात्रता : इयत्ता १२ वी नंतर उच्च शिक्षणासाठी व्यावसायिक अभ्यासक्रमात प्रवेश घेतलेले विद्यार्थी, शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळाल्याचे प्रमाणपत्र, इतर मागास वर्ग, विमुक्त जाती-भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व धनगर समाजातील विद्यार्थी पात्र, किमान ६० टक्के (दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी ५० टक्के गुण), पालकांचे वार्षिक उत्पन्न २ लक्ष ५० हजारांपेक्षा जास्त नसावे, कमाल वय ३० वर्षांपर्यंतच पात्र, विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा तसेच कोणत्याही नोकरी/व्यवसायात नसावा.


# शासकीय प्रक्रियेत अडकले एमआरआय युनिटचे लोकार्पण

## कार्यान्वित असूनही रुग्णांना सेवा नाकारली जाते

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी:** जिल्ह्यातील रुग्णांसाठी दिलासादायक ठरणारी आधुनिक एमआरआय () मशीन बुलढाणा जिल्हा सामान्य रुग्णालयात कार्यान्वित झाली असूनही, अद्याप अधिकृत लोकार्पण न झाल्यामुळे ही सेवा सामान्य रुग्णांसाठी बंदच आहे. गेले दोन महिने मशीन कार्यान्वित असून सर्व तपासण्या करण्यास सज्ज आहे, मात्र शासकीय प्रक्रियेतील अडथळ्यांमुळे तिचा लाभ रुग्णांना मिळू शकलेला नाही.



जिल्ह्यातील ही एकमेव एमआरआय मशीन असून, यामुळे जिल्ह्यातील सर्वसामान्य रुग्णांना अन्य खाजगी रुग्णालयांवर अवलंबून राहावे लागत होते. मात्र आता जिल्हा सामान्य रुग्णालयात स्वतंत्र इमारतीमध्ये ही अत्याधुनिक सुविधा उभी राहिली आहे. मशीन पूर्णतः कार्यक्षम असून, तंत्रज्ञ आणि इतर सर्व यंत्रणा सज्ज आहेत, असे एमआरआय तंत्रज्ञ प्रवीण वानखडे यांनी सांगितले.

**रोज ५ ते १० रुग्णांना परत जावे लागते**

दररोज एमआरआय तपासणीसाठी ५ ते १० रुग्ण येत आहेत, मात्र अधिकृत उद्घाटन न झाल्यामुळे त्यांना परत पाठवले जात आहे. परिणामी रुग्णांचे आर्थिक नुकसान होत असून, खासगी रुग्णालयांमध्ये हजारो रुपये खर्च करून तपासण्या कराव्या लागत आहेत.

**लोकार्पणाची प्रतीक्षा**

या संपूर्ण प्रक्रियेबाबत विचारले असता जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दत्तात्रय बिराजदार यांनी सांगितले की, ''सर्व यंत्रणा कार्यान्वित आहेत. केवळ शासकीय स्तरावरून अधिकृत लोकार्पणाची प्रक्रिया प्रलंबित आहे. येत्या १० ते १५ दिवसांत ही सेवा रुग्णांसाठी सुरू होईल असा आमचा अंदाज आहे.''

**रुग्णांचे नुकसान टाळण्यासाठी तातडीने पावले उचलावीत**

रुग्णसेवेच्या दृष्टीने अत्यावश्यक असलेली ही सुविधा अधिक काळ प्रलंबित राहिल्यास त्याचे गंभीर परिणाम होऊ शकतात. जिल्हा प्रशासनाने तातडीने लक्ष घालून, उर्वरित शासकीय प्रक्रिया पूर्ण करून सेवा रुग्णांसाठी खुली करावी, अशी मागणी रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांकडून करण्यात येत आहे.